(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 03.05.2023

# एस. एन. मोर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा कार्यशाळा

गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचलित सेठ नरसिंगदास मोर महाविद्यालयात करिअर गार्डन्स अँड प्लेसमेंट सेल, ग्रंथालय विभाग आणि युनिक अकॅडमी नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने "महाविद्यालय स्तरावर स्पर्धा परीक्षा तयारी" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. राहुल भगत यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. सुनील कान्होळकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सचिन एस. वेरुळकर समन्वयक, करिअर गायडन्स अँड प्लेसमेंट सेल यांनी केले.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. गजानन पाटील, युनिक अकॅडमी नागपूर हे तज्ञ म्हणून उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शन करताना पाटील यांनी "महाविद्यालयीन स्तरावरच स्पर्धा परीक्षांबाबत अध्ययनाचे नियोजन केल्यास यश हमखास मिळू शकते." असे प्रतिपादित केले. प्रमुख मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा अध्ययन करताना येणाऱ्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला याप्रसंगी डॉ. गोल्डी बगमार, प्रा. लक्ष्मण पेटकुले, प्रा. ज्ञानेश्वर जांभुळे, प्रा. कमलेश राऊत, डॉ. आशिष सहारे, ग्रंथालय सहाय्यक लता खंडाईत, संदीप वाघमारे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रम प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

